वाचा :- मा. जिल्हा न्यायालय, लातूर यांचा कार्यालयीन आदेश दिनांक ०३.१०.२०२५

---

# :: जाहीर प्रगटन ::

दिनांक २४/१२/२०२५

सर्व जनतेस कळविण्यात येते की, लातूर जिल्हा न्यायालयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी एकत्रीतरित्या जुने न वापरता येण्या जोगे लोखंड, स्टील, लाकुड व प्लॅस्टीक इत्यादी वस्तु असून सदर वस्तुंचा " जसे आहे तसे'' या तत्वावर दिनांक ३०/१२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता जाहीर लिलाव करण्यात येणार आहे.

तरी दिनांक ३०/१२/२०२५ रोजी बोली लावणा-यांनी लातूर जिल्हा न्यायालयात आवारात हजर रहावे. जाहीर प्रगटनासह लिलाव विक्रीच्या अटी व शर्ती जिल्हा न्यायालयाच्या **https://latur.dcourts.gov.in/** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(संजय जु. भारूका)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
लातूर
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
लातूर

जा.क./ ८२०१ /२०२५
जिल्हा न्यायालय, लातूर
दिनांक: २४/ १२ /२०२५

याची एक प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :-

१. मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर यांच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यासाठी.
२. मा. दिवाणी न्यायालय व.स्तर, लातूर यांच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यासाठी.
३. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी,लातूर यांच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यासाठी.
४. जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यासाठी.
५. तहसिल कार्यालय, लातूर यांच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यासाठी.
६. महानगर पालिका, लातूर यांच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यासाठी.
७. सगणक विभाग, लातूर यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यासाठी.
८. दैनिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यासाठी.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
लातूर
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
लातूर

" परिशिष्ट अ "

- लिलाव विक्रीच्या वस्तुंचे/मालाचे वर्णन आणि अटी व शर्ती खालील प्रमाणे -

१. वस्तुंचे/मालाचे वर्णन

| अ.क्र. | वस्तुचे वर्णन | एकूण संख्या/नग | अंदाजित वजन (KG) |
|---|---|---|---|
| १ | लाकडी खुर्च्या, लाकडी बाकडे, लाकडी स्टूल, लाकडी पाय ठेवण्याचे खोके, लाकडी कपाट, लाकडी टेबल, महाराज केनिंग, लाकडी खुर्ची, लाकडी रॅक, लाकडी पेटी, लाकडी प्लायवुड पार्टीशन, लाकडी प्लॉयवुड दरवाजे, कॉम्प्युटर टेबल | १०६ | ३८००.०० |
| २ | संगणक, संगणक विथ प्रिंटर आणि युपीएस, प्रिंटर टि. व्ही.एस. डॉट मॅट्रीक प्रिंटर, यझर टोनर, व्होलटेज स्टॅबीलायजर, डिव्हीडीआरडब्ल्यु, कॉम्बो स्वीच रॅक मोडम, सी.आर.टी मॉनीटर जुने, फायबर खुर्च्या, फायबर तीन खुर्च्याचा सेट, फायबर चार सीटचे बाकडे, सुटकेस व ब्रिफकेस, भींतीवरील घडयाळ, कचरा साफ करण्याची मशिन Forbes Jazz कंपीनीची ॲक्रेलिक प्रोटेक्शन शीट, पाणी शुध्दीकरण यंत्रे, फ्रॅकींग मशीन व वजन काटा | ४७४ | ११००.०० |
| ३ | लोखंडी खुर्च्या, लोखंडी बाक पाठनसलेला, लोकडी टेबल, बाजुस बॉक्स, टेबल लॅम्प, लोखंडी नोटीस बोर्ड, कुलर, स्टीलचा पिंप/स्टीलची पाण्याची टाकी, लोखंडी थ्री सिटर काळया रंगाचा परफोटेड कोटेड वॉटर कुलर, रिव्हाल्वींग खुर्ची इन्व्हर्टर, तराजु, लोखंडी बकेट, स्टील ग्लास, स्टील मग, स्टील जग, बेल कॅन लोखंडी, लोखंडी पाईप, लोखंडी स्टॅंड, लोखंडी जाळया, लोखंडी शटर व पत्रा, लोखंडी पंप मोटार, कॉम्प्युटर व्हील चेअर. | २४७ | ३५००.०० |

(नोट-उपरोक्त वस्तु हया जिल्हा न्यायालयाच्या आवारात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.)

२. अटी व शर्ती

1- संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या लिलावाचे ठिकाणी केवळ दोनवार लिलाव होणार असून, लिलाव तीनवार करणेसाठी जिल्हा न्यायालय, लातूर या कार्यालयाकडे अहवाल सादर केला जाईल. सबब लिलाव तीनवार करणेसाठी संबंधीत बोलीदार व बेलिफ यांनी लिलावाच्या दिवशी कळविलेल्या तारखेस जिल्हा न्यायालय, लातूर येथे अंतिम बोलीसाठी उपस्थित रहावे.

2- जिल्हा न्यायालय, लातूर येथे तीनवार लिलावात यशस्वी ठरलेल्या बोलीदारानी लिलाव अंतिम होईल त्यादिवशी बोलीची पुर्ण रक्कम दिवाणी न्यायालय व. स्तर लातूर येथे बेलिफामार्फत जमा करावी लागेल. व बोलिदाराने सदरच्या वस्तु या आहे त्या

स्थितीतून आहे त्या ठिकाणाहून स्वखर्चाने त्याच दिवशी ताबडतोड घेवून जावयाचे आहेत.

3- लिलावाची बोली रक्कम पुर्ण जमा केलेनंतर लिलाव कायम करण्याचे आदेश पारीत करण्यात येतील.

4- लिलावात बोली कोणत्या रक्कमेने वाढवायची ते विकीचे काम चालविणा-या अधिका-याकडून ठरविण्यात येईल. लिलाव किती रक्कमेस मागीतला किंवा कोणी मागीतला याबाबत कोणताही वाद उपस्थीत झाल्यास संबंधीत वस्तूचे ताबडतोड पुन :लिलाव केले जातील.

5- जे कोणी कोणत्याही वस्तूची सर्वात जास्त किंमत देवू करेल त्याला त्या वस्तूचा खरेदीदार करण्यात येईल मात्र नेहमी असे समजावे की तो बोलीदार लिलाव मागण्यास कायदेशीर रितीने सक्षम असला पाहिजे. आणखी पुढे असे ठरवण्यात येत आहे की, सर्वात जास्त किंमतीच्या बोलीत देवू काढलेली रक्कम जेंव्हा स्पष्टपणे इतकी अपुरी असल्याचे दिसून येईल ती बोली नाकारणे योग्य होईल. तेंव्हा न्यायाधीश किंवा विकीचे काम चालविणारे अधिकारी हे त्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार ती बोली नाकारु शकतील.

6- विकीचे काम चालविणा-या अधिका-यांना आवश्यक वाटल्यास तो लिलाव स्थगित करण्याची कारणे नमुद करुन विकीचे काम स्थगित करु शकतात.

7- प्रत्येक वस्तूची किंमत विकीच्या वेळी अगर त्यानंतर विकीचे काम चालविणारा अधिकारी मागतील त्यावेळी दिली पाहिजे व त्यात कसूर झाल्यास उक्त मालमत्तेचा ताबडतोड पुन्हा लिलाव केला जाईल आणी ती पुन्हा विकली जाईल व अशा दुस-या लिलावाच्या वेळी जर सदर गटाची किंमत कमी आली तर मुळ लिलावाच्या वेळी पैसे भरण्यात कसूर करणा-या व्यक्तीकडून विकीतील तुटीची रक्कम वसूल केली जाईल व ती तशी वसूल न झाल्यास ती रक्कम सदर व्यक्तीची जंगम मालमत्ता जप्त करुन वसूल केली जाईल.

8- लिलावाचे पुर्ण अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, लातूर यांच्याकडे असतील.

9- लिलावात अपेक्षीत रक्कम न आल्यास अथवा अन्य काही कारणाने लिलाव रद्द करावयाचा झाल्यास त्याचे पुर्ण अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, लातूर यांच्याकडे रहातील.

आज दिनांक २४.१२.२०२५ रोजी आमच्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

DISTRICT AND SESSIONS COURT LATUR

स्थळ : - लातूर
दिनांक : - २४.१२.२०२५

(संजय जु. भारुका )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
लातूर